**SNDT Women's University**
**Department of Students' Development**
1st Floor, Patkar Hall Building,
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai - 400 020.

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
**विद्यार्थी विकास विभाग**
पहिला मजला, पाटकर हॉल इमारत,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.

Telephone : 2203 1879 Ext. 1302 & 1260 • Direct : 022-2207 2209 / 2201 8893
Email id :- dsw@sndt.ac.in • Website : www.sndt.ac.in

संदर्भ.क्र.वि.वि.वि./आंतर विद्यापीठ/२०२५-२०२६/१३४. नोव्हेंबर १४, २०२५

प्रति,
विभागप्रमुख / प्राचार्य / संचालक,
पदव्युत्तरविभाग / संचलित व संलग्नित महाविद्यालये / संस्था.
मुंबई व उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सवात सहभागी संघ
एसएनडीटी महिला विद्यापीठ

विषय: आंतरविद्यापीठ South West विभागीय युवा महोत्सवाच्या निवड फेरीसाठी उपस्थित राहणेबाबत.

माननीय महोदय/महोदया,

असोसीएशन ऑफ इंडियन युनिवर्सिटीज, नवी दिल्ली द्वारा आयोजित आंतर विद्यापीठ South West विभागीय युवा महोत्सवासाठी दरवर्षी विद्यापीठाकडून विद्यार्थीनींचा संघ पाठवण्यात येतो. त्या अनुषंगाने विविध संचलित, संलग्नित व पदव्युतरविभागासाठी विद्यापीठस्तरीय अंतिम निवड फेरी आयोजित केली जाते. या वर्षी देखील ही निवड फेरी दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चगेट आवार येथे आयोजित केली आहे. आपल्या महाविद्यालयाकडून / विभागाकडून संगीत (Music), ललितकला (Fine Arts), नाट्यविभाग (Theatre), नृत्य (Dance), साहित्य (Literary event) या कला प्रकाराच्या निवड फेरीसाठी एसएनडीटी महिला विद्यापीठ, चर्चगेट आवार येथे मुली पाठवाव्यात. उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थिनींची यादी dsw@sndt.ac.in आणि dswcultural.coordinator23@gmail.com या मेलवर पाठवावी.

अंतिम निवड फेरीसाठी विभाग प्रमुख, विद्यार्थी विकास विभाग व सांस्कृतिक समन्वयक तसेच तज्ञ मंडळी पाटकर सभागृह, चर्चगेट आवार येथे दि. ५ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहतील. अंतिम निवड फेरीसाठी उपस्थित विद्यार्थिनींना व संघ प्रमुखांना विद्यार्थी विकास विभागाकडून प्रमाणपत्र दिले जाईल.

आपणास विनंती आहे की सदर निवड फेरीसाठी जास्तीत जास्त विद्यार्थीनींना उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

धन्यवाद.

आपला विश्वासू

14/11/2025

डॉ. नितीन स. प्रभूतेंडोलकर
विद्यार्थी सहाय्यक अधिष्ठाता
विद्यार्थी विकास विभाग